# प्रौढांची गुडघेदुखी आणि होमिओपॅथिक उपचार

Osteoarthritis हा अस्थिसंस्थेशी निगडित आजार आहे. अस्थिसंस्थेमध्ये हाडे, सांधे, कुर्चे, स्नायुबंध आणि स्नायूंचा समावेश होतो. यांच्या साहाय्यानेच उभे राहणे, चालणे, धावणे, बसणे या शारीरिक हालचाली होत असतात. जितका जास्त वापर या अस्थिसंस्थेचा केला जातो, तितके त्याचे कार्य व्यवस्थित चालू राहते, परंतु सध्या शारीरिक कष्टांचे प्रमाण जसे कमी कमी होत गेले तशा सांधेदुखीच्या तक्रारी वाढू लागल्या. याचे कारण म्हणजे बदललेली जीवनशैली.

निरोगी व्यक्तीच्या शरीरात प्रत्येक सांध्यामधील कुर्चा हे शॉकअ‍ॅब्झॉर्बरचे काम करते. सांध्यांमधील हाडांचा शेवटचा भाग हा कठीण, पण रबरी अशा कुर्च्यांनी आच्छादलेला असतो. ज्यामुळे दोन हाडांमधील घर्षण कमी प्रमाणात होते. जसजसे वय वाढत जाते तसतसे हा कुर्चा फाटण्याची संभावना वाढत जाते आणि हाडे एकमेकांवर घासू लागतात. यामुळे वेदना होऊ लागतात आणि हालचालींवर निर्बंध येतो.

अशाप्रकारे ऑस्टिओआर्थ्रायटिस या आजारात सांध्यांमधील हाडे आणि कुर्चा झिजते. त्यामुळे सांधेदुखी आणि सांध्यांमध्ये आखडलेपणाला सुरुवात होते. त्यामुळे सांध्यांची हालचाल व वापर कमी प्रमाणात होऊ लागतो. सांध्यांभोवती सूज येऊ लागते. अशी सांधेदुखी बोटांतील हाडांमध्ये, मानेतील व नितंबातील मणक्यांमध्ये गुडघ्यांमधील सांध्यांमध्ये दिसून येते.

सुरुवातीला जास्त श्रमानंतर अशी सांधेदुखी दिसून येते, परंतु हळूहळू शारीरिक हालचाली केल्या नाहीत तरी वेदना जाणवू लागतात. या यांत्रिक कारणांमुळे सांध्यांवर जास्त प्रमाणात ताण आल्यामुळे झीज व्हायला सुरुवात होते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे शरीराचा वाढलेला स्थूलपणा, पायांमधील उंचीत फरक असणे किंवा सांध्यांना झालेली इजा. शरीराचा संपूर्ण भार गुडघ्यांवर येत असल्यामुळे गुडघेच या आजाराला जास्त करून बळी पडतात. त्यामुळे आयुष्याच्या उत्तरार्धात खूपजणांमध्ये गुडघेदुखीचा त्रास होत असलेला आणि डॉक्टरांनी गुडघ्यांचे प्रत्यारोपण करण्याचा सल्ला दिलेला आढळून येतो.

**लक्षणे :** १. गुडघेदुखीचा त्रास वयाच्या ४५ नंतर सुरू होतो. सुरुवातीला अधूनमधून हळुवार वेदना होतात. ज्या काही कालावधीनंतर असह्य होऊ लागतात. २. हालचालीनंतर, जास्त वेळ उभं राहल्यानंतर गुडघ्यांवर ताण येऊन वेदना चालू होतात. आराम केल्यानंतर बरं वाटतं. सकाळच्या वेळी उठल्यानंतर गुडघे आखडलेले वाटतात. ३. गुडघ्यामधील पोकळी कमी होऊन हाडं एकमेकांना घासली गेल्यामुळे हालचाल करताना त्रास होतो. ४. हात लावल्यानंतरदेखील दाह निर्माण होतो. त्यामुळे गुडघ्यांना स्पर्श झाल्यास गरमपणा जाणवतो. ५. पायांना बाक येतो. ६. गुडघ्यासंबंधित पायांचे स्नायू कमकुवत होतात किंवा निकृष्ट होतात. हळूहळू त्रास इतका बळावतो की, दैनंदिन हालचाली करणेही अवघड होऊन बसते.



**होमिओपॅथी चिकित्सा व उपचार**
**डॉ. अमरसिंह निकम**

**कारणांवरून वर्गीकरण : १. प्राथमिक कारणे :** लठ्ठपणा, स्नायुदौर्बल्य, अपघात, चेतातंतूंचे आजार. यामुळे शरीराच्या हालचाली सुरळीतपणे न झाल्यामुळे गुडघ्यावर ताण येऊन गुडघे झिजतात. हा प्रकार अनुवंशिक असू शकतो. तसेच याचे प्रमाण रजोनिवृत्ती झालेल्या महिलांमध्ये जास्त दिसून येते.

**२. द्वितीय कारणे :** गुडघे झिजण्याचे कारण इतर आजारांमुळे जसे की, जन्मतः सांध्यांमधील दोष, संधिवात, गाऊट, चयापचयाचे आजार किंवा संप्रेरकांचे विविध आजार. जसे की, हीमाक्रोमॅटॉसिस, अ‍ॅक्रोमेगॅली, मधुमेह इ.

**निदान :** एक्सरे व लक्षणांवरूनच या आजाराचे निदान केले जाते.

**उपाय :** १. वजन कमी केल्याने गुडघेदुखीचा त्रास कमी होऊ शकतो. २. नियमित व्यायाम. जसे की, चालणे, स्ट्रेचिंग करणे, पोहणे, सायकलिंग करणे इत्यादी.

**केस :**

चेहऱ्यावर त्रस्त भाव घेऊन ५१ वर्षांची एक महिला काठीच्या साहाय्याने चालत माझ्या कन्सल्टिंगमध्ये आल्या. गुडघेदुखीच्या वेदनांमुळे त्यांच्या डोळ्यांत पाणी आले होते. सहा वर्षांपूर्वी अपघातात डाव्या गुडघ्याला इजा झाली तेव्हापासून गुडघेदुखीचा त्रास चालू झाला. एक्सरेमध्ये गुडघ्याच्या कुर्च्याची झीज झालेली दिसून आली. त्यांची शस्त्रक्रिया करण्यात आली. तरीसुद्धा गुडघेदुखीचा त्रास होतच होता. वेदनेमुळे त्यांच्या चेहऱ्यावर खूपच दुःखद, रडलेले भाव होते. सर्व प्रकार, औषधोपचार करून त्या थकल्या होत्या.

**तक्रारी : १. गुडघेदुखीचा त्रास ६ वर्षांपासून :** सुरुवात डाव्या गुडघ्यापासून ते उजव्या गुडघ्यापर्यंत झाली. गुडघ्यामध्ये तीव्र पोळल्यासारख्या वेदना होतात. चालताना, आंबट खाल्ल्यानंतर, जीना चढताना आणि उतरताना, मानसिक त्रासाने वेदना वाढतात. बर्फाने शेकल्यावर आणि पोटावर झोपल्यावर बरे वाटते.

**२. उजवा खांदेदुखीचा त्रास १ महिन्यापासून :** अतिश्रमामुळे खांदेदुखीचा त्रास चालू झाला. उजवा खांदा आखडला गेल्यामुळे उजव्या हाताच्या हालचाली मंदावल्या होत्या.

**आजारांचा पूर्वेतिहास :** १. लहानपणी टॉन्सिल्स काढून टाकले.

२. पूर्वी २ ते ३ वेळा टायफॉइडचा त्रास झाला होता.

**विशेष माहिती :** १. खाण्यात मांसाहाराची, आइस्क्रिम, थंड पदार्थांची आवड. २. माश्यांची नावड. ३. आंबट पदार्थांमुळे सांधेदुखीचा त्रास. ४. फळांमुळे, फळरसांमुळे अ‍ॅसिडिटीचा त्रास होतो. ४. शरीरावर भरपूर घाम येतो. ५. अस्वस्थ झोप लागणे. ६. उष्ण प्रकृती. ७. भूतांची, सापांची स्वप्नं पडणे.

**स्वभाव : तुमच्या लहानपणाविषयी सांगा.**

माझे लहानपण लखनौमधील श्रीमंत घराण्यात गेले. तीन भावंडांमध्ये मी सगळ्यात लहान होते. माझी माझ्या आईशी खूप जवळीक होती, परंतु इतर कोणातच मी मिसळत नसे.

**तुमच्या स्वभावाविषयी सांगा.**

माझा स्वभाव खूप हळवा आहे. मी पटकन एखाद्याला मदत करते. त्याचबरोबर मला पटकन रागसुद्धा येतो. माझं लग्न खूप कमी वयात झालं. लग्नानंतर माझ्या स्वभावात खूप बदल झाला. सासूबाईंच्या धाकामुळे मला सतत त्यांच्याप्रमाणे वागावं लागलं. सगळं करूनसुद्धा मला त्यांच्याकडून सतत टोमणे मिळायचे. असं असूनसुद्धा मी त्यांच्याशी नम्रपणे वागले, परंतु माझ्या मिस्टरांनी मला त्यावेळी सपोर्ट केला नाही. त्यामुळे मला आता त्यांच्याविषयी जास्त बाँडिंग वाटत नाही. पूर्वी २ ते ३ वेळा मी सासूबाईंमुळे आत्महत्येचाही प्रयत्न केला होता.

**तुमच्या वैवाहिक जीवनाविषयी सांगा?**

माझ्या लग्नापासून मिस्टरांनी कधीच माझी काळजी घेतली नाही. माझ्याशी कुठल्याच गोष्टी शेअर केल्या नाहीत. त्यांना त्यांच्या व्यवसायात खूप तोटा झाला. त्याविषयीसुद्धा मला काहीच सांगितले नाही. त्यांचा व्यवसायही बंद झाला. आता संपूर्ण घर माझ्यावर अवलंबून आहे.

फॅशन डिझाइनमध्ये माझे करिअर व्यवस्थित चालू आहे. मिस्टरांविषयी मला खूप राग येतो. पण मी तो व्यक्त करू शकत नाही. मला सध्या माझ्या मुलांच्या भविष्याची खूप काळजी वाटत राहते. मी त्यांच्याबाबतीत खूप हळवी आहे.

**तुमचा छंद :** मला गाणी ऐकण्याची आवड आहे.

**संपूर्ण व्यक्तिमत्त्व :** १. उष्ण प्रकृती. २. खाण्यात थंड पदार्थ, मांसाहाराची आवड. माश्यांची नावड. ३. पाठीवर झोपल्यावर तक्रारी वाढणे. ४. अपघातामुळे त्रासाला सुरुवात. ५. आत्महत्या करण्याची प्रवृत्ती. ६. काळजीवाहू स्वभाव. ७. गाण्यांची आवड. ८. दडपला गेलेला राग. ९. वेदनेशी संवेदनशीलता. १०. दुःखीकष्टीपणा.

**प्रतिसाद :** वरील लक्षणांवरून मी त्यांना होमिओपॅथिक औषध चालू केले आणि माझ्या रुग्णालयात भरती व्हायला सांगितले. दैनिक तपासणीच्या वेळी तिसऱ्या दिवशी त्यांचा हातदुखीचा त्रास कमी झाला होता. त्यांच्या हाताची हालचाल व्यवस्थित होऊ लागली. ५ ते ७ दिवसांतच गुडघेदुखी ७० टक्के कमी झाली. १० ते १५ दिवसांत त्या आधाराशिवाय चालू लागल्या आणि गुडघ्याची शस्त्रक्रिया टळली. उपचारानंतर चेहऱ्यावर स्मितहास्य दिसून आले.

## आपलं व्यासपीठ

### सुखसागरनगर येथे कचराकुंडी ठेवावी

सुखसाखरनगर येथे कचराकुंडी नसल्यामुळे नागरिकांना राजीवगांधीनगर येथील कचराकुंडीमध्ये कचरा टाकावा लागत आहे. सुखसागरनगर भाग एक व भाग दोन असा मोठा परिसर आहे. पूर्वी अंबामाता मंदिरासमोर रस्त्याकडेला कचऱ्याची कुंडी होती. परंतू आता तिथे ती नाही. अंबामाता मंदिर हे मध्यवर्ती ठिकाण आहे तेथिल जवळपासच्या रस्त्याच्या कोपऱ्याला कचराकुंडी ठेवल्यास नागरिकांना कचरा टाकणे अधिक सोईस्कर होईल. अनेक नागरिक अंबामाता मंदिराकडून खंडोबा मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर एका बाजूला कचरा टाकतात त्याठिकाणी कचराकुंडी ठेवावी.

– तथागत सोनवणे

**टीप :** आपल्या परिसरातील समस्यांबाबत आपली मते १०० ते १५० शब्दांत आपल्या छायाचित्रासह व पत्त्यासह खालील पत्त्यावर पाठवावीत.

पत्ता : दैनिक 'पुण्य नगरी' बहिरट पाटील आर्केड, दुसरा मजला, बालगंधर्व चौक, शिवाजीनगर, पुणे – ५. Email : ambika.pune@gmail.com

## वेळीच उपचार केल्यास संधिवात बरा होतो : डॉ. पराग संचेती

### जागतिक संधिवात दिनानिमित्त शिबिराचे आयोजन

**पुणे : प्रतिनिधी**

संधिवात झाल्याचे लवकर लक्षात आल्यानंतर त्यावर उपचार केल्यास त्यातून रुग्ण लवकर बरा होऊ शकतो असा विश्वास डॉ. पराग संचेती यांनी व्यक्त केला.

जागतिक संधिवात दिनानिमित्त संचेती हॉस्पिटलतर्फे हाडांचा व सांध्यांचा संयुक्त आठवडा साजरा करण्यात येणार आहे. तसेच संबंधित विकाराने त्रस्त असणाऱ्या रुग्णांसाठी व्याख्याने आणि शिबिरांचे आयोजन केले आहे. त्याअंतर्गत विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. २० ऑक्टोबरपर्यंत हा उपक्रम चालू राहील. हा उपक्रम १५ व १६ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते २ दरम्यान होणार असून, त्यात मोफत तपासणी करण्यात येणार आहे. तसेच १७ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता वॉकेथॉन, तर १८ रोजी सकाळी साडेसात वाजता सायकल रॅली काढण्यात येणार आहे.

बदलत्या जीवनशैलीमुळे बहुतेक रुग्ण हे संधिवात, एन्कोलिसिस, मणक्यांना आलेली सूज, एसएलई, युवा पिढीतील संधिवात यांनी प्रभावित आहे. योग्य वेळेत रोगाचे निदान होणे गरजेचे असते असे संधिवातरोगतज्ज्ञ डॉ. अजित नलावडे यांनी दिली. धूम्रपान, मद्यपान, जास्त वजन आणि व्यायामाची कमतरता अशा जीवनशैलीमुळे ऑस्टिओपोरोसिस होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे हाडांची घनता गुणवत्ता कमी होते. यामध्ये विशेषतः मणका आणि मनगटाच्या हाडांच्या अशक्तपणामुळे फ्रॅक्चर होण्याचा धोका वाढतो, असे डॉ. केतन खुर्जेकर यांनी सांगितले.

## यूथ Talkers

**मुंबई आणि पुण्यातील महत्वाचा दुवा असलेल्या एक्स्प्रेस वेला देशातील पहिला ग्रीन कॉरिडॉर करणार असल्याची घोषणा शनिवारी केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू राज्यमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पुण्यात केली आहे. त्यामुळे आता या मार्गावर वाहनांच्या धुरामुळे होणारे प्रदूषणाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता आहे. या प्रकल्पात कोणकोणत्या बाबींचा समावेश असावा, हे सांगणाऱ्या तरुणांच्या या प्रतिक्रिया...**

### निलगिरीच्या झाडांचा समावेश असावा



सनील गाडेकर

रस्त्यांच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात झाडे असावीत, याबाबत कोणाचेच दुमत नसावे. मात्र ही झाडे कोणती असावीत याबाबत विचार होणे गरजेचे. निलगिरीची झाडे लावल्यास मोठ्या प्रमाणात प्रदूषण कमी होते. त्यामुळे ग्रीन कॉरिडॉरमध्ये निलगिरीच्या झाडांचा समावेश असावा. तसेच डिव्हायडरमध्ये हीच झाडे लावण्यात यावीत. एक्स्प्रेस वेवरील प्रदूषण कमी झाल्यास त्याचा सकारात्मक परिणाम शहराच्या वातावरणावर होईल.

– विनायक कांबळे

### पर्यावरणातील समतोल राखला जाईल



या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे पुणे-मुंबई एक्स्प्रेस वेची शोभा वाढणार असून, प्रदूषणही कमी होण्यास मदत मिळणार आहे. रस्ते बनविण्यासाठी मोठ्या प्रमाणात झाडे तोडण्यात येतात. त्यामुळे या माध्यमातून पुन्हा झाडे लावण्यात येत असल्याने पर्यावरणातील समतोल राखण्यासाठीही मदत होईल. हा प्रकल्प त्वरित सुरू होऊन लवकर पूर्ण होणे गरजेचे आहे.

– मधुर जोशी

### पर्यावरणविषयक जनजागृती हवी



या ना त्या कारणाने आतापर्यंत कोट्यवधी झाडांची कत्तल करण्यात आली आहे. त्याचा परिणाम नैसर्गिक प्रक्रियांवर झाला आहे. त्यामुळे झाडांची लागवड करणे गरजेचे आहे. झाडे वाढविण्यासाठी ग्रीन कॉरिडॉरच्या माध्यमातून करण्यात येत असलेला प्रयत्न स्वागतार्ह आहे. त्यातून पर्यावरणविषयक जनजागृती करण्यात यावी, त्याचा सर्वांनाच फायदा होईल.

– मॅडी जैन

### प्रवास सुखकर होईल



दुतर्फा झाडे लावण्यात येणार असल्याने रस्त्यावरील थंडावा वाढणार आहे. लांब पल्ल्याचा हा प्रवास सुखकर होईल. तसेच अपघातांवरही नियंत्रण येईल. मात्र अगदी रस्त्यालगत असलेल्या ठिकाणी मोठी झाडे लावण्यात येऊ नयेत. त्यातून अपघाताची शक्यता आहे. रस्ता परिसरात मोठी झाडे लावल्यास ध्वनिप्रदूषणही कमी होऊ शकेल. कारण झाडांच्या गर्दीमुळे आवाज रोखला जाईल.

– मयूर थोरात

## सर्जरीमध्ये बदल व्हावा : डॉ. जयश्री मेहता



**पुणे : प्रतिनिधी**

सर्जरी या विषयात काळानुरूप बदल होण्याची आज गरज आहे, असे मत मेडिकल कॉन्सिल ऑफ इंडियाच्या अध्यक्षा जयश्री मेहता यांनी व्यक्त केले.

भारती विद्यापीठ विश्वविद्यालय, सर्जरी विभाग व सर्जिकल सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या इंटरनॅशनल कॉलेज ऑफ सर्जनच्या ६१ व्या वार्षिक परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर भारती विद्यापीठ विश्वविद्यालयाचे संस्थापक डॉ. पतंगराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ. शिवाजीराव कदम, कार्यवाह डॉ. विश्वजीत कदम उपस्थित होते.

डॉ. मेहता पुढे म्हणाल्या, माहिती तंत्रज्ञान व तांत्रिक प्रगती झाल्याने रोबॅटिक सर्जरी आता केली जात आहे. मेडिकल कॉन्सिल ऑफ इंडियाने हाती घेतलेल्या उपक्रमाची माहिती त्यांनी यावेळी दिली. शैक्षणिक बदल, नितीमत्ता, व्यावसायिकता यावर अधिक भर देणार असल्याचे त्यांनी संगितले.

मानासिक प्रश्न, लैंगिक प्रश्न, संशोधन याचा समावेश अभ्यासक्रमात असावा असे त्यांनी नमूद केले. यावेळी डॉ. पतंगराव कदम, प्रा.शिवाजीराव कदम यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

डॉ. विवेक सावजी यांनी मेडिकल कॉलेजमधील विविध उपक्रमांची व वैशिष्ट्यांची माहिती दिली.

## वाघोलीत अपघातात तरुण गंभीर जखमी

**वाघोली : प्रतिनिधी**

वाघोली येथे वॉशिंग सेंटर मधे आलेली कार कठडा ओलांडून पत्र्याच्या शेड मध्ये घुसल्याची घटना सोमवारी दुपारी तीनवाजण्याच्या सुमारास घडली. या अपघातात शेडमधे झोपलेला तरुण कारखाली सापडून गंभीर जखमी झाला आहे.

अंकुश गुणाजी गोडगळे वय २२ असे गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी लोणीकंद पोलिस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत तक्रार दाखल झाली नव्हती. गोडगळे याच्यावर वाघोली येथील एका खासगी रुग्णालयात उपचार करुन पुण्यातील रुग्णालयात पाठविण्यात आले आहे.

## सचिन दामले यांचे निधन



**पुणे :** सदाशिव पेठ येथील सचिन कमलाकर दामले (वय ३८ वर्षे) यांचे अकाली निधन झाले. त्यांच्यामागे आई, वडील, बहीण, दाजी असा परिवार आहे. शनिवार पेठेतील बस कंपनी ग्रुपचे ते सक्रिय सदस्य होते.



Ayurex-Ndx
त्वरित घ्या असरदार स्टॅमिना साठी आयुर्वेदीक कॅप्सुल
एक कॅप्सुल एक तास आधी
साध्या पाण्या सोबत जेवणाच्या
कृपया अविवाहीत पुरुषांनी ह्याचा वापर करु नये
आयुरेक्स एनडीएक्स कॅप्सुल सर्व मेडीकल स्टोअर्स मध्ये उपलब्ध.
असरदार पावरफुल आयुरेक्स तेल सर्व मेडीकल स्टोअर्स मध्ये उपलब्ध.

लग्नापुर्वी वा लग्नानंतर सैक्स समस्या
फोन करुन मोफत सल्ला घ्या
लहानपणीच्या चुकांमुळे यौन दुर्बलता, सैक्सची कमतरता, शीघ्रपतन, मर्दानी कमजोरीने हताश झालेल्या स्त्री–पुरुष, लग्नापूर्वी किंवा लग्नानंतर फोन करुन मोफत सल्ला घ्या. घरी बसल्या औषधी मिळवा.
आपले नाव व पत्ता गुप्त ठेवला जाईल.
09212048300 09555137800 अकबर दवाखाना

सिकंदरे आज़म जगातील सर्वश्रेष्ठ
भारतात सेक्स पावर कॅप्सूल उपलब्ध
नविन विश्वास, एकाच कॅप्सूलने इंद्रियात अविश्वसनीय वाढ व स्फुर्ती नसांची खराबी, शीघ्रपतन, स्वप्न दोष, नपुंसकता दूर करा. मनासारखा सेक्स टाईम मेडीकल स्टोअरमधून खरेदी करा वा फोन करा.
09212358677
09311303434

Proprietor Sunil Chandak Govt Reg.No.7342
+पेन केअर सेंटर+
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अ.नगर
खालील व्याधी (आजारावर) सल्ला व उपचार
सांधेवात, गुडघेदुखी
मान, पाठ, कंबरदुखी
मायग्रेन (डोकेदुखी)
फ्रोझन शोल्डर (खांदेदुखी)
सायटीका, स्लिप डिस्क
टाचदुखी, टेनिस एल्बो
हातापायात मुंग्या येणे

पुणे – जंगली महाराज रोड, हॉटेल शुभमच्या पाठीमागे, दुर्गाशंकर बिल्डींग (कृपया अपॉईंटमेंट घेऊनच येणे) महिन्यातुन अल्टरनेट दोन रविवार सकाळी ८ ते ३ मो. 9420808990, 9403354523, 9822899660

विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी सेक्स तज्ञांचा सल्ला व आयुर्वेदिक औषधी उपलब्ध

हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, शिथिलता, हायपोगोनॅडिझममुळे लहान लिंग,
मधुमेहामुळे आलेली लैंगिक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : विर्यामध्ये शुक्रजंतुची संख्या कमी असणे.
अ‍ॅझुस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.
आशाकिरण क्लिनीक
गुलाब पॅव्हेलीयन, दुसरा मजला, डेक्कन बस स्टॉपच्या मागे, डेक्कन, पुणे. वेळ - ११ ते ६ पर्यंत.
7875451644, 8657122333
औषधीसाठी. संपर्क - 7769856821